REFBK-0020489
REFBK-0020489

# आभाळवेल

दत्ता हलसगीकर

ଦା୦ ଉ୦ ୨୦୪୮୯
୩୦।୩।୯୯

୬।୦୯

୨୨୫୮

# आषाढघन

...ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक
अनुक्रम 20869 दि: ...
वर्ग 2266 नों. दि: 30/3/54

दत्ता हलसगीकर

REFBK-0020489
REFBK-0020489

अभिनव प्रकाशन, मुंबई १४

प्रथमावृत्ती : डिसेंबर १९७३

© दत्ता हलसगीकर, सोलापूर

किंमत : रुपये चार

मुखपृष्ठ : विश्वास जाधवराव

प्रकाशक :
वामन विष्णु भट
अभिनव प्रकाशन, ५३ नानक मार्केट,
डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४

मुद्रक :
म. गो. प्रधान
सत्यसेवा मुद्रणालय,
अलिबाग–कुलाबा

जिचे जीवन म्हणजेच एक तपस्या

त्या माझ्या प्रिय आईस —

# कवितेतून कवीकडे

कवीच्या वेदनेला दिव्य वेदना असे म्हटले जाते. ती दिव्य वेदना हा त्याचा वर आहे आणि शापही आहे. दिव्य असली तरी अखेर ती वेदनाच ना ? वर आहे एवढ्याचसाठी की ह्या दिव्य वेदनेमुळेच कवीच्या हृदयातली व्यथा गीताचा आकार घेऊन सरूप होते. आणि शाप आहे एवढ्याचसाठी की ही व्यथा त्याला कुठल्याही सुखाचा आस्वाद पूर्णत्वाने घेऊच देत नाही. आत्यंतिक सुखाच्या उत्तुंग क्षणीही ती त्याला त्या सुखामधल्या अपूर्णतेच्या, क्षणभंगुरतेच्या दर्शनाने व्यथित व्हायला लावते. ही दिव्य वेदना नसती तर कवि कवि झालाच नसता. त्याच्या जन्मासहच ती वेदनाही जन्मते आणि त्याच्यासहच ती अनंतात लय पावते. कवीला कवित्व लाभत असते ते ह्या दिव्य वेदनेमुळेच.

पण नुसत्या वेदनेमुळे कांही कुणी कवि होत नाही. वेदनेला दिव्यत्वाचा स्पर्श झाल्याशिवाय माणसातला कवि जिवंत होत नाही, जागा होत नाही. दुःखातही जो सौंदर्याची उपासना सोडीत नाही त्याचीच वेदना दिव्य उच्च जातीची असू शकते. मनुष्यातल्या...किंबहुना मनुष्यजातीच्या अपूर्णतेने जो दुःखी होतो, स्वतःच्या अपूर्णतेत जो समग्र मानवतेची अपूर्णता पाहतो आणि त्या अपूर्णतेची जाणीव आपल्या रक्तात एखाद्या जहरासारखी खेळवीत ठेवून जो स्वत:तल्या अस्वस्थतेचा कधीच लय होऊ देत नाही आणि जीवनातल्या सुंदरतेचेच स्वप्न जो अखंड पाहत राहतो तो कवि होऊ शकतो. कवीने नेहमी अतृप्त, अस्वस्थ, असमाधानीच असावयास हवे. हे दिव्य असमाधान काळजात बाळगूनच त्याने श्वासोच्छ्वास करीत राहावयास हवा. जे सामान्य त्याचा त्याग आणि जे असामान्य त्याची ओढ कवीच्या काळजात असायला हवी, एकदा का कवि तृप्त झाला, स्वस्थ झाला, समाधान पावला की कवि म्हणून

तो संपलाच. कशाने म्हणून त्याने सुखी होताच कामा नये. तरच त्याच्या अश्रूतून त्याची कविता अमृताच्या झऱ्याप्रमाणे सतत वहात राहील. कविता हवी तर वेदनेला कवटाळूनच कवीने जगले पाहिजे.

हे सारे सांगण्याचे कारण एवढेच की दत्ता हलसगीकरांची कविता वाचताना मला ह्या दिव्य वेदनेचे दर्शन जागोजाग घडले आणि एक फार मोठे समाधान लाभले. समाधान ह्याचसाठी की ज्याच्या नसानसातून काव्य खळखळत वहाते आहे असा एक जागा, जिवंत, ज्वलंत कवि मला त्यांच्या कवितेत सापडला. दिव्य वेदनेने जखमी झालेला, कवितेच्या नादाने झपाटलेला, जगतानाच्या क्षणाक्षणातून अपूर्णतेच्या दर्शनाने व्यथित झालेला तसाच कणाकणातून शोधलेल्या सौंदर्याच्या स्पर्शाने धुंदितही झालेला.

दत्ता हलसगीकरांनी अनेक जातीची कविता लिहीली आहे. कधी प्रेम-कविता तर कधी सामाजिक आशयाची कविता, कधी सोज्वळ अभंगरचना, तर कधी उन्मुक्त मुक्तरचना. त्यांची सगळ्या प्रकारची सगळ्या तऱ्हेची कविता मी वाचली, न्याहाळली, तपासली, उलगडून पाहिली. पण मला त्यांच्यातला खरा कवि सापडला तो त्यांच्या तत्वचिंतनात्मक कवितेतूनच. आणि त्याच कवितेबद्दल मला ह्या ठिकाणी खूप बोलावेसे— किंबहुना केवळ ह्याच कवितेबद्दलच मला मुख्यकत्वेकरून लिहावेसे वाटतेय.

जीवन हा प्रकाशछायेचा खेळ आहे, सुखदु:खाचा तो एक लंपडाव आहे, शिवाशिवाचा संघर्ष आहे, यशापयशाची ती एक साखळी आहे हे त्यांनी जाणले आहे—ह्या कटु सत्याचा पूर्णतया स्वीकारही केला आहे. अशा अपूर्ण जीवनालाच त्यांनी बेबंदपणे कवटाळूनही धरले आहे.

**हे जीवन अतिसुंदर तरिही अशिवाची छाया**
**अशा जगाची किती लावलीस दयाघना माया**

जीवनातल्या अपूर्णतेचाही त्यांनी स्वत:ला लळा लावून घेतला आहे. हेही देणे त्या ईश्वराचेच आहे असे ते मानतात. ह्या अपूर्ण जगाशी जडलेले नाते ते तोडू इच्छित नाहीत. जर जीवन हे एक ईश्वरी देणे आहे तर ते जसे आहे तसेच स्वीकारले पाहिजे अशी त्यांची भावना आहे.

**इथे सुखाच्या नदीत वाहे दुःखाचे पाणी**

ह्याला आपला इलाज नाही असे ते मानतात. दुःखाचेही ते मोकळ्या मनाने, मुक्त हस्तांनी स्वागत करतात. सुखामागून दुःख ही अपरिहार्य नियती ते मानतात. म्हणूनच

**दुःख सुखाचेच एक हळवे रूप असते**

असे ते सहज सांगून जातात. पण दुःखालाही ते दयार्द्र, करुणामय मानतात. कारण दुःखामागून पुन्हा नियतीचे चक्र सुखाचे दान देणार अशी कुठेतरी आशा त्यांच्या मनात चमकून जाते. किंवा हे दुःख भोगतानाच्या आपल्या असामान्य धैर्यात आपलाच गौरव आहे अशी त्यांची भावना असावी.

**सदा हसत गावीत विष अमृताची गाणी**

असे तेही हसत म्हणू शकतात, ते ह्या दुःखावरच्या अपार विश्वासानेच, दुःखातही ते शांत राहू शकतात, वादळातही त्यांच्या आत्म्याची ज्योत शांतपणे तेवत राहते. कारण दुसऱ्याच्या अलोट दुःखाशी तुलना करता आपले दुःख थिटे आहे हे जाणण्याचा समंजसपणा आणि सुजाणता त्यांच्यापाशी आहे.

**माझ्या ओंजळीतलेच दान खरे, त्याच्यावर नम्र माथा ठेवतो**
**दुसऱ्यांशी तुलना केली असती तर कधीच विझून गेलो असतो.**

पण तरीही कधी कधी हा समंजसपणाही त्यांच्यातल्या वेदनेला बांध घालू शकत नाही. मग बेफाम पूर आलेल्या पावसाळ्यातल्या नदीप्रमाणे त्यांची दुःखे एकदम समंजसपणाचे सारे तट उध्वस्त करून त्यांना आक्रोश करायला लावतात. जीवनातल्या अन्यायाने चिडून उठलेला त्यांच्यातला बंडखोर जागा होतो आणि जगन्नियंत्याला जाब विचारतो.

**माझे इच्छित जर तुझ्याजवळ नव्हते**
**काही बाही देण्यापेक्षा गप्प बसायचे होते**
**मला नको ते देऊन उगा टाकले दुःखात**
**तू दातारा ठरलास माझ्या उरात आकांत**

हा त्यांच्यातला बंडखोर कधी कधी स्वतःतल्या अपूर्णतेने इतका व्यथित होतो की मग त्या असंतोषाला सौम्य भाषा बोलणे अशक्य होते. काळजात

सिंहाचे धैर्य पण जन्म मात्र मेंढरांचा अशा विपरित नियतीची त्यांना मग मनस्वी चीड येते अशा वेळी एकच हत्यार ते उपसू शकतात आणि ते म्हणजे जळजळीत शब्दांचे. पण त्या शब्दांच्या आगीच्या असमर्थतेचीही कधी कधी चीड येऊन ते म्हणतात

**मुकेपणाने जगलो असतो ना मी**
**कशाला शब्दांना दिलीस धग**
**आयुष्याचे खरेच थुंकीपात्र केलेस**
**भोवताली तुझे हसणारे जग**

ही असहाय्यतासुद्धा कधी कधी इतकी असह्य होते की मग त्यांच्या उरातली वेदना अगतिक होऊन स्फुंदू लागते

**खूप तहान, थोडे पाणी, नदी राहे दूर दूर**
**चंदनकाडी, देवापुढली, बाकी नुसता धूरच धूर**

कवीमधली ही प्रखरता प्रखर आहे आणि कोमलताही तितकीच कोमल आहे. आपल्याला पंख आहेत आणि आपण विपंखही आहोत हे कवीला जाणवते तेव्हा तो जीवनातल्या अपरिहार्य विनाशाने हतबुद्ध होतो. जीवनात सौंदर्यालाही वाया जावे लागते, व्यर्थ जन्मावे लागते— शेवटी सारे मातीलाच मिळते आणि अंत टाळता येत नाही हे कवीला जाणवते आणि मग पराभव असह्य होऊन तो पुन्हा एका दिव्य नैराश्याच्या कुशीत आपल्याला झोकून देतो. आपण असहाय्य आहोत ह्याचीही त्याला क्षिती वाटत नाही, त्याबद्दल अश्रू ढाळण्यासही त्याला अर्थ वाटत नाही. पण म्हणून तो नियतीला शरण जात नाही. कारण

**जागरूक आत्म्याच्या पापण्या बंदच करता येत नाहीत**

जीवनात संघर्ष आहेत, पराजय आहेत, नैराश्य आहे, मृत्यूही आहे, म्हणून मूर्ख धुंदीचा किंवा अज्ञानातल्या ढोंगी आनंदाचा आश्रय कवि घेत नाही. सगळ्या सगळ्या अनुभवासाठी त्याने आपल्या आत्म्याचे दरवाजे उघडे ठेवले आहेत. कारण ...

**सगळी दारे उघडी ठेवली म्हणून बरे झाले**
**नाहीतर सडून गेलो असतो आजवर हवाबंद पोकळीत**

जीवन क्षणभंगुर असले तरी जोवर जीवन आहे, जोवर दुःखाच्या छातीवर पाय ठेवून माणूस जिवंत उभा आहे तोवरच जीवनातल्या सत्याचा शोध घेण्याची महान संधीही उपलब्ध आहे हे कवीला कळले आहे म्हणूनच तो

**मातीच्या पणतीत दिवा शांत तेवतो आहे**

अशी उदात्त कविता गाऊ शकतो. अपूर्ण, विषम, विसंगत, क्षणभंगुर, मर्त्य, विनाशाकडे प्रतिक्षणी प्रवास करणाऱ्या जीवनाच्या पार्श्वभूमीवर कवीचे हे नितांत सौंदर्यप्रेम, सौंदर्यावरची असीम श्रद्धा आणि सौंदर्याची एकांतिक उपासना विशेष तेजाने उजळून निघाली आहे.

दत्ता हलसगीकरांच्या कवितेतल्या वेदनेला मी दिव्य म्हणते ती त्यांच्यातल्या ह्या कणखर सौंदर्यवादित्वामुळेच. एखाद्या योद्धाच्या युयुत्सुपणाइतकाच त्यांचा सौंदर्यावरला विश्वास प्रखर आहे. जीवनावरती श्रद्धा, मांगल्यावरती भक्ति असले झिजून गुळगुळीत झालेले शब्द मी त्यांच्या बाबतीत वापरीत नाही. मला लक्षणीय वाटला तो जीवनातली अपूर्णता जशीच्या तशी पत्करणारा त्यांच्यामधला सामर्थ्यसंपन्न वास्तववाद. वास्तवाच्या भूमीवर ते घट्ट पाय रोवून उभे असल्याने त्यांच्या नजरेला लागलेला सौंदर्याचा वेध त्यांना अधिक शोभून दिसतो, हेच खरे.

आपल्या दिव्य वेदनेला त्यांनी असेच हळुवारपणे जपत राहावे. ही दिव्य वेदनाच त्यांच्या कवितेला कधीच थांबू देणार नाही, संपू देणार नाही. त्यांच्या हृदयातली सौंदर्याची गाणी ह्या दिव्य वेदनेच्या तालावरच चिरकाल झंकारत राहाणार आहेत.

शिवशक्ती, वरळी मुंबई १८.

**शिरीष पै**

## ते म्हणालेत

ते म्हणालेत : "पहाट लवकरच होईल, असे अस्वस्थ होऊ नका."
आम्ही दाट काळोखात बुडालेलों दिशाहीन तळमळत होतो
गळाभर खोल गाळात रुतलेलो वर येण्यासाठी धडपडत होतो
आम्ही रक्तहीन...एखाद्या थेंबाची वाट पाहात होतो
स्वत्व हरवलेले आम्ही वरदानासाठी तिष्ठत होतो

ते आले, म्हणाले, "अरेरे, काय ही तुमची दशा
ही तुमची लक्तरे म्हणजेच तुमच्या अबोल आत्म्याची भाषा
माणसाने माणसाला अशा पातळीवर ठेवणे हे पाप
म्हणूनच आम्ही अवतरलो आहोत, तुमचे होऊन मायबाप
आमच्या हातात शस्त्र येण्यासाठी तुम्ही तुमचा आवाज द्या
आमच्या पायांना गती येण्यासाठी तुम्ही तुमचे पंख द्या."
आम्ही आवाज दिले, पंख दिले, मागितले ते ते दिले
आमच्या कल्याणासाठी ते आमच्यापासून दूर गेले.
जाताना म्हणाले, "आता थोडीशी कळ सोसा, अंधाराला भिऊ नका,
पहाट लवकरच होईल, असे अस्वस्थ होऊ नका."

अंधार संपलाच नाही, उलट गडद होत गेला
कळालेच नाही कोण कधी कसा लुबाडला गेला
समजले की पवित्र वास्तूत रोज व्यभिचार चालू आहे
समजले की माळीच आता बाग कुरतडून खातो आहे
लफंग्यांनी घातलेत वेष साधूंचे, ठोकताहेत नीतीप्रवचने
समजले की प्रत्येकाच्या कुशीत एकेक लफडे गोजिरवाणे

पाहायचे पण बोलायचे नाही, आपण त्यांना पंख दिलेत
त्यांच्या खुर्चीखाली आपण आपले गरीब मेंदू ठेवून दिलेत
कुणी हसवेल, कुणी फसवेल ..नासवेल नाही म्हणू नका
ते म्हणालेत, "पहाट होईलच होईल, असे अस्वस्थ होऊ नका"

खरे सांगू का, आपल्यासाठी त्यांना अंधारच हवा आहे
त्यांना मस्त मिरविण्यासाठी आपला खांदा हवा आहे.
आपल्यातल्या सुंदोपसुंदीनेच ते जिवंत राहणार आहेत
तुमचा आमचा घोळका जमवून ते महंत होणार आहेत
उद्या कदाचित् उजाडलेच तर सगळेच जागे होतील म्हणून
त्यांनीच त्यांच्या खुर्चीखालच्या मातीत सूर्य ठेवलाय गाडून
दिलाय जन्म तसा घालवा, उगाच तक्रार करू नका
ते म्हणालेत, "सूर्य लवकरच उगवेल, असे हताश होऊ नका."

ग्रंथ संग्रहालय,
क्रमांक २०४५८ दि: ...
२२६८

## स्वागत

दुःख येणार म्हणाले तर त्याचे स्वागत करावे
सर्वांनीच झिडकारले तर त्याने कोठे जावे ?
त्याला हात धरून आणावे : उंबरठ्यावरती
त्याचे चरण प्रक्षाळून सुख उतरून टाकावे

त्यालाच आवडतीलशा काही गोष्टी बोलाव्यात
डोळ्यामधले पाणी त्याला नकळत लपवावे
जखम पुसून साफ करून तीवर रांगोळी रेखावी
आपल्या देवाचे आसन नम्रतापूर्वक द्यावे

आपल्या इच्छा अनिच्छेचा चिलिया प्राणात कांडून घ्यावा
कळ दाबून तेव्हा उरात, सुरेख गाणे गावे
अतिथीने आपलाच जीव बळी मागितला तर
आपणच आपल्या हाताने उखळांत कांडून घ्यावे

दुःख दयार्द्र असते... अतीव करुणामय असते
दुःख सुखाचेच एक हळवे रूप असते
आपण मात्र प्रसन्नपणे स्वागत केले तर
दुःख सुखाचा आशीर्वाद देऊन आपली काळजी वाहते...

## सुंदर !

तू हसताना जितकी सुंदर
त्याहुन सुंदर डोळ्यामधुनी घन झरताना

चांदण्यात तू जितकी सुंदर
त्याहुन सुंदर भरमाध्यान्ही तू श्रमताना

गाताना तू जितकी सुंदर
त्याहुन सुंदर गीताने व्याकुळ होताना

मीलनात तू जितकी सुंदर
त्याहुन सुंदर प्रतिक्षेत क्षण क्षण जळताना

जागेपणी तू जितकी सुंदर
त्याहुन सुंदर पहाटस्वप्नामधि हसताना

मिठींत माझ्या विश्वासाने
चंद्रमुखी तू
लाटेपरि मिसळुन जाताना !

# दुसऱ्याशी तुलना केली असती....

दुसऱ्यांशी तुलना केली असती तर आम्ही जिवंत राहिलो नसतो
शेजारच्या बागेतला मोहर पाहून देठातच सुकून गेलो असतो
अरे, ज्याचे त्याला मिळत असते, आभाळगाणे किंवा माती
रागवायचे, रुसायचे, चिडायचे तरी कुणावरती ?

पलीकडच्या बंगल्यात राहणारा तो श्रीमंत आंधळा आहे
भरल्या संसारातून एखाद्याची बायको निघून गेली आहे
कुणी आपली स्वप्ने हरवून रानभरी झाला असेल
आत्म्याचे ओठ बंद करून कुणी स्वत:ला विकत असेल !

मी एक सुंदर स्त्री पाहिली अश्रू लपवून रडतांना
एक दीनवाणा म्हातारा पाहिला मुलावेगळा उदास जगताना
असे खूप जग पाहतोय अंधार पाठीवर वाहणारे
रात्रच रात्र खाली आणि झगमगणारे वर तारे

माझ्या ओंजळीतलेच दान खरे. त्याच्यावर नम्र माथा ठेवतो
दुसऱ्यांशी तुलना केली असती तर कधीच विझून गेलो असतो !

## अंधारयात्रा

ही अशी अंधारयात्रा आंधळ्या वाटेवरी
आंधळ्यांची रांग कोठे चालली ते ना कळे
जो पुढे आहे तयाच्या हात पाठी ठेवुनी
मागचाही जोडतो त्या पावलांना पाऊले

पुण्यपापाचीच गल्लत जीवनाची धर्मशाळा
रक्त भरले हात त्यांचे फूल कोणा वाहती
आपल्या देहोत्सवाचा आगळा शृंगार व्हावा
याचसाठी जे दुज्याच्या फूलबागा मोडिती

या इथे जळते चिता ही संस्कृती यांची असे
संस्कृती ? थूः संस्कृतीचे नाव का घेता उगा ?
भोग झाला प्रिय तेव्हा प्रिय झाली इंद्रिये
आंधळ्यांना प्रिय झाला वासनावेडा फुगा

ही अशी अंधारयात्रा मार्ग सारा आंधळा
सूर्य कोठे लोपला ही काळजी लागे मला !

## उणे दुणे

उणे दुणे काढल्याने सुखी होते काय कोणी ?
सदा हसत गावीत विष अमृताची गाणी

रात्रंदिन जागणारा आर्त जिव्हाळा पहावा
सुखासाठी जळणारा प्राणदिवा न्याहाळावा

कधी चिंतेच्या काजळाने डोळे भ्यालेले पहावे
आणि आपल्या यशाने तृप्त झालेले पहावे

उणे दुणे काढल्याने सुखी होते काय कोणी
कधी उन्हात चालणे.. कधी अमृताची गाणी !

# रात्र अशी अंधारी

रात्र अशी अंधारी
आभाळही भरलेले
अन् वादळ वाऱ्याने
आसमंत भ्यालेले

भिऊ नकोस ये जवळी
ही छाती तुजसाठी
लखलखती वीजहि मी
सखि, प्राशिन तुजसाठी

मी प्रकाश.... तू छाया
मी पौरुष...तू प्रीती
कर करांत असताना
बुडण्याची का भीती ?

रात्र अशी अंधारी
आभाळही भरलेले
मी अवघ्या जन्माचे
गगन तुझ्यावर धरले....

# त्याला इलाज नाही

त्याला इलाज नाही : हे असे होणारच होते
उडण्याआधीच पाखराचे पंख गळून पडणार होते
तुझे सर्वस्व उधळून प्रवाहाच्या लाटेत होतीस पोहत
मी तटस्थ : काठावरून सारे होतो पाहात

तुला सांगितले होते, " प्रिये, अशी लपेटून राहू नकोस मला
माझ्या कलंदराच्या वाटेवर केवळ विस्तवाच्या भाजणाऱ्या झळा "
पण तुझे आपले फुलणे... दरवळणे रोजच उदबत्तीच्या सुवासासारखे
किती समजाविले तरी तुझे डोळे समईतल्या ज्योतीसारखे...

आता डोळे भरतेस तेव्हा काळीज गलबलून जाते
त्याला इलाज नाही. हे असे होणारच होते

## बाकी

थोडी पाने
थोडी फुले
बाकी हाती नुसती माती

थोडा चंद्र
थोडी पहाट
बाकी भयाण किर्रर राती

खूप तहान
थोडे पाणी
नदी राहे दूर दूर

चंदनकाडी
देवापुढती
बाकी नुसता धूरच धूर

# मित्र

मित्र मिळविले... गळ्यात गळे घातले
ओठीचे पोटीचे असे काहीच नाही राहिले
देहाने आत्म्याला सांगावे असे सारे सांगितले
हातचे काही ठेवायचे असते हे कधीच नाही कळले

झोडपून काढलेल्या चिंचेच्या फांदीसारखे आयुष्य झाले
मैत्रीच्या जत्रेत अवघे घर मित्रांवर उधळले
तळमळच अशी होती : नागवेपण जाणवत नव्हते
हसणारे खुश्शाल हसले... रडणारांशी माझे नाते होते

नागवेपणाची जाग आली तेव्हा लंगोटीसाठी मी हात पसरले
बापहो, वस्त्रविभूषित माझे दोस्त दाराआडून मला हसले.

## पदर

पदर तुझा जर ढळला नसता
तर हे झाले नसते वादळ
शीळ मनातुन घुमली नसती
थबकुन चळले नसते पाउल

चावट मिस्किल एक पापणी
मलाहि नकळत मिटली नसती
शृंगाराच्या लाजफळांची
मोहक धांदल दिसली नसती

कळले नसते सुंदर सौष्ठव
पूर्ण उमलत्या कमळफुलांचे
दिसले नसते वसंत वैभव
मदालसेच्या रसकुंभाचे

शहाणपणा वादळांत झोकुन
कैफ तुझा मज चढला नसता
ही कविता झुळझुळली नसती
पदर तुझा जर ढळला नसता......

## गाणे

एक गाणे ओठाचे
एक गाणे पोटाचे
एक गाणे नाचविणाऱ्या
निळ्या हिरव्या नोटांचे

एक गाणे लाटांचे
एक गाणे वाटांचे
एक गाणे झिरपणाऱ्या
देहरूप माठाचे

एक गाणे जनाचे
एक गाणे मनाचे
एक गाणे पाऊसचिंब
अंतर्बाह्य उन्हाचे

एक गाणे गुणाचे
क्षितिजपल्याडच्या घनाचे
एक गाणे देवाघरच्या
सुंदर आमंत्रणाचे !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ...२०५८८... वि: ...
... मों दि ... ३०।३।८७

## आशिवाची छाया

इथे फुलांच्या मार्गावरती सर्प हिंडती
इथे दिव्याच्या घरात देखिल मुक्या तमाच्या व्यथा

इथे सुशोभित मांडवातही नियती क्रूर हसे
रम्य चांदण्याखाली कोठे चिता जळत राहते

इथे सुखाच्या नदीत वाहे दुःखाचे पाणी
गतजन्मीचा शाप भोगतो भाग्यवंत कोणी

हे जीवन अतिसुंदर तरिही अशिवाची छाया
अशा जगाची किती लाविलीस दयाघना माया...

# वादळभाषा

आषाढघनागत भरून येणारे काळीजकोवळे डोळे
अरे, फुलाच्या मनाला एवढी जखम पुरेशी होते
शब्द कसा चांदण्यासारखा ओठांनी टिपून घ्यावा
प्रहार करायचाच असेल तर पारखून घ्यावे नातें

निषादकथा वाचलीस की नाही मला माहित नाही
करुणानदीचे पाणी कधी ओंजळीत घेतलेस का ?
अशी कशी रे सदाकदाची वीजभारली भाषा
कधी कुणाच्या डोळ्यांत खोलवर डोकावून पाहिलेस कां

असाच असावा पुरूष ताठ . .अहंमन्य गरजणारा
म्हणून तर खुळ्या डोळ्यांनी तुझा घेतला ध्यास
खूप मोठा असशील रे तू, मला न कळेल एवढा
तरी देखील गोडसा झरा असावा खडकात खास

आपले माणूस म्हटल्यावरती काळजाजवळ यावे
काही चुकलेमाकले तर क्षमेत अपराधी होते
उगाच फडफड...वादळभाषा...कमळे फाटून जातात
प्रीत कोमेजायला एवढी जखम पुरेशी होते....

## मेघदूत

गडद गहन घन गगनी आर्द्र आर्त आर्त हवा
मेघदूत करि माझ्या जळत मंद वीजदिवा
श्लोक श्लोक वाचुनिया पापण्यांत जमले ढग
“ मेघदूत ” गळुन पडे वाढताच उरि तगमग

ही अशीच कुंद हवा पाऊस रिमझिम थोडा
बागेतिल बाकावर भिजलेला क्षण वेडा
“ हा असाच पाउस रे झेलावा अधरावर
सुखभरले गीत असे उमलावे श्वासावर ”

जळपुष्पे वरुणाची झेलित त्या बेहोषित
लाजण्यात भिजलेले तू लिहिले स्पर्शगीत
तो पाउस रिमझिमता....हा पाउस थरथरता
लखलखती वीज जाय धरणीहुन गगनपथा

शापित मी जन्मठेप भोगतसे तुजवाचुनि
म्हणुन कधी नेत्रदळी तरळति गे आठवणी
गडद गहन घन गगनी तीच आर्द्र आर्त हवा
मेघदूत उरि माझ्या जळत आत प्राणदिवा....

# एक दिवस

एक दिवस असा येतो : आपण फार चांगले होतो ।।

झोपेमधून जागे होता देवासाठी जुळतात हात
तेव्हा सुगंधाची फुले मनामध्ये उमलतात
मन प्रसन्न झाल्यावरती सारेच प्रसन्न वाटू लागते
रागावलेल्यावरती देखील आपले प्रेम जडू लागते
दूरच्या मित्रांना आपण जवळपणाची पत्रे लिहितो

आपण कधी चुकलो होतो त्याची लाज वाटू लागते
कुठे कुणाला टाकून बोललो ते वाक्य छळू लागते
आठवते, कोणी किती आपल्यासाठी हाल सोसले
आपले जीवन फुलविताना कोण कसे सुकून गेले
डोळे भरून येतात आणि त्यांचे ऋण मान्य करतो

दारी आलेला भिकारी तेव्हा विन्मुख जात नाही
मदतीसाठी येणाराला आपण नाही म्हणत नाही
आपले घर त्या दिवशी खूप खूप मोठे होते
देशामधल्या दारिद्र्याने हृदय तडफडू लागते

आणि म्हणतो : इतके दिवस जगलो ते जगलोच नाही
आपल्यामधले आपण कधी आपल्याला दिसलोच नाही
व्यर्थ भांडलो जगाशी : व्यर्थ मोहाधीन झालो
जे जे उत्कट चांगले होते त्याच्यापासून दूर गेलो
सारे कळून येते आणि मनामधला देव गातो

एक दिवस असा येतो : आपण फार चांगले होतो

## फार दिवसांनी

आज फार दिवसांनी
आली तुझी आठवण
माझ्या चांदण्याच्या घरी
आले आभाळ भरून........

फार दिवसांनी आले
माझ्या सुखी डोळां पाणी
माझी मला दया आली
आज फार दिवसांनी !

## कळा

पान गळतानाच्या कळा देठापासूनच्या
थेंब सुटतानाच्या कळा ढगापासूनच्या
दीप विझतानाच्या कळा वातीपासूनच्या
चंद्र बुडतानाच्या कळा रातीपासूनच्या

प्राण उडतानाच्या कळा देहापासूनच्या
तू जातानाच्या कळा किती जन्म आधीच्या...?

## छळ

एका लहरी दिवशी छळवादी व्हावे खूप
आणि खूप रडवावे एक निष्पापसे रूप

पहाटेच नकळत फूलमिठीतून जावे
घरी उशीरा येऊन डोळे घाबरे करावे

तेव्हा आर्जवी हातचे काही खाऊ पिऊ नये
रडण्याला बोलण्याला तेव्हा बळी जाऊ नये

खोल उरी बोचणाऱ्या सुया माराव्यात लाख
एका विद्ध पक्षिणीचे संथ न्याहाळावे दुःख

तिचे कापराचे मन माझ्या उन्हाने पेटावे
मंद ज्योतीच्या तेजांत थोडे मीही उजळावे

असे छळावे छळावे, तिने वितळून जावे
झरणाऱ्या आसवात माझे सुख तरंगावे

सदाफुलीलाही कधी अबोलीचे फूल यावे
माझे छळणे संपता अबोलीने गाणे गावे ...

## पाठीवरच्या गोणी ।

हसणारे लाख आहेत ...रडणारे नाहीत कोणी
ज्याने त्याने वाहायच्या आपल्या पाठीवरच्या गोणी

आपल्या पायामधले काटे आपणच काढायचे
तत्त्वज्ञानाचे मलम आपणच लावायचे

आपणच अंधार भेदून प्रकाशदीप शोधायचा
आणि आपल्या जन्माचा वसंतोत्सव करायचा

भोजनाला सोबती आहेत ..तुमच्या गळां हार घालतील
तुमच्या बागेमधली फुले कोटावर लावून फिरतील

माणसे ओळख विसरतात तुम्ही पाण्यात बुडताना
त्यांना कामे असतात. बिलकुल वेळ नसतो त्यांना

डोळे गाळता ...गाळा ...पुसणारे नाहीत कोणी
ज्याने त्याने वाहायच्या आपल्या पाठीवरच्या गोणी..............

## शब्द

या शब्दांना वेळीच सावरून धरले म्हणून बरे झाले
नाहीतर शब्द भलतेच बोलून गेले असते
या शब्दांना माघारी बोलावले म्हणून बरे झाले
नाही तर शब्द छेद करून पार गेले असते

शब्द तरूण... बंदुकीतल्या दारूसारखे ज्वालाग्राही
अस्मितेच्या खाली पोट असते हे त्यांना माहीत नाही

# रोप

दारापुढे फुले लावणारांच्या मनांत आधी फुलतात फुले
खिडकीवाटे डोळ्यांत झुकते नक्षत्रांचे आकाश निळे
सुवासाने दाटते हृदय...कोवळे होतात श्वास निश्वास
रोप लागायाच्या आधी त्याच्या दारात उरांत फुलांची रास

दारापुढे फुले लावणारांच्या पोटांत याव्यात फुलांच्या कळा
नाहीतर रोप मरून जाते...बीजालाही काही लागतो लळा

# म्हणून म्हणतो

म्हणून म्हणतो
तुझा हात उशी म्हणून दे

आजची रात्र
नदीसारखी वाहत जाऊ दे

उगाच भीती :
आज बुडालेला सूर्य उद्या उगवेल ?

म्हणून म्हणतो
तुझे अश्रू तीर्थ म्हणून दे.

## शाप

पावलाखाली सूर्य झाकून तो चाललाय
मला हे जाहीर सांगता येत नाही
कारण माझ्या समईची वात
त्यानेच पेटवली आहे

त्यानेच तुमच्या आमच्यात
पाटाचे पाणी अडवले आहे
मला जाहीर आक्रोश करता येत नाही
कारण
माझ्या वाडग्यात पाणी वाढून तो पुढे गेलाय

त्यानेच तुमच्या पिकात लांडगे सोडले आहेत
मला तुम्हाला सावध करता येत नाही
कारण
मी खात्त असलेली भाकरी त्यानेच वाढली आहे

सगळे सांगायसाठी तडफडतोय
पण त्याने माझे ओठ शिवलेत
हात ठेवून घेतलेत गहाण
आणि शाप दिलाय
त्याचे पाप डोळे उघडे ठेवून पाहण्याचा !

## जखमा

जखमांना कुरवाळून ठेवणे बरे नव्हे
अश्रूंचा गंगाकलश पूजणेही बरे नव्हे
बरे नव्हे उरींच्या जखमांना सजवणे निर्माल्य वाहून
उध्वस्त स्वप्नांची पालखी मिरविणे बरें नव्हे

जें आपले नसते ते आपल्यापाशी राहात नाही
आपले नसतेच, त्यासाठीं सुतक पाळणे बरे नव्हे !

# ओलीस

आमच्याही डोळ्यात अंगार असतो
शब्दात वाघनखे असतात
डोक्यात वादळ असते
आमच्याही आयुष्याला
तुमच्या नजरेसारखी
तलवारीची धार असते

पण हा जन्म
तुमच्याकडे ओलीस आहे ना,
म्हणून आम्ही
विझलेल्या राखेसारखे थंड
वस्त्रहरण पांचालीचे
पांची पांडव षंढ !

## लाव गे तू दीप

लांबलेल्या सावल्यांची ही कहाणी सावळी
ये अशी उध्वस्त वेळी तू सुखाच्या पाउली
माळ सारा राख झाला पानही नाही कुठे
शिंप माझ्या अंगणी तू अमृताच्या ओंजळी

ओठ सुकले, काळजाची हाक तू ऐकून ये
लाव गे तू दीप माझ्या तिमिरभरल्या राउळी !

## काळोख

काळोखाचा खेद आणि काळोखाची भीती
काळोखावरतीच आपण चर्चा करतो किती
म्हणतो, असा काळोख अनादि काळापासून आहे
अनंतापर्यंत असाच वाढत राहणार आहे.

काळोखातूनच येतो...जातो आणि ठेचकाळतो
काळोखातच आपला सुद्धा काळोख मिसळतो
आणि म्हणतो, किती काळोख ........केव्हा प्रकाशणार ?
आमचे रस्ते...आमच्या वाटा केव्हा सापडणार ?

काळोखात जगणाऱ्या माणसा एवढे लक्षात ठेव
तुझ्या मनातला विझलेला दिवा निदान पेटवून ठेव !

# झपझप चाललेत पाय

मे महिन्याची दुपार-- रणरणते ऊन्ह
झगमगता सूर्य आभाळामधून
जाईफुलासारखी नाजुक पोर
घेऊन निघाली बापाला भाकर
गिरणीचा भोंगा आत्ता होईल
दमला बाप फाटकात येईल
उशीर झाला म्हणून रागावेल काय ?
झपझप चाललेत नाजुक पाय !

घरचे सगळे तिनेच केले
आजारी आईला औषध दिले
धाकट्या भावाची घेतली शिकवणी
पाठच्या बहिणीची घातली वेणी
येईल तसा शिजवला भात
तापलेल्या तव्याने पोळले हात
तरीपण डोळ्यात पाणी नाही
आईचीच आज ती होती आई
डोळे भरून पाहात होती माय
झपझप चाललेत नाजुक पाय
माथ्यावर ऊन्ह–पायाखाली ऊन्ह
परिस्थितीचे मनात ऊन्ह

निखाऱ्यात तापलेल्या धरणीमाये
पोरीचे पाऊल कमळाचे आहे !
तिच्या पावलाखाली चंदन हो
माथ्यावरच्या सूर्या, चंद्रमा हो
अरे, तिच्या डोळ्यातली भीती पहा
घड्याळा, थोडेसे मागे राहा
बापासाठी लेक ओढीने जाय
झपझप चाललेत नाजुक पाय !

## उशीर

आता कळून सारे कळण्यात अर्थ नाही
ह्या उमलल्या फुलाला आता सुवास नाही

ते भेटलेच नाही जेव्हा तहान होती
हा कुंभ अमृताचा माझा मुळीच नाही

मी हाक मारलेली काळीज भेदुनिया
काळीज विद्ध झाले, आलास मात्र नाही

ऐशीच कां तुझी ही सारी कृपा फुकाची
की पुण्य तेवढे गा माझ्याचपाशी नाही

## शब्द

या शब्दांनी जुळती तारा . मनात फुलती फुले
या शब्दांनी वसंतवैभव जीवनातुनी खुले
या शब्दांनी अंधारातुन उजळत ये चंद्रमा
अनंतातले क्षितिज मिठित ये....शब्दांचा महिमा

या शब्दांनी हृदये जळती....जळती सुखभावना
मरण लोचनी घेउन फिरते प्राणांतिक वेदना
या शब्दांनी दिशा फाटती अंधारच अंधार
रक्तचिंब हा घाव उरीचा शब्दांचीच कटयार

या शब्दांनी विश्व नांदते उरात धरुनी प्रीत
या शब्दांनी विश्व कोसळे ही शब्दांची नीत.....

## नाते

कुठे कुणितरी जळत राहतो
कुठे कुणितरी फुले
कुठे कुणाची मुकी वेदना
सुखात कोणी जळे

सरणावरती जीवन तरिही
जितेपणाचा लळा
भिजल्या डोळ्यातिल पाण्याला
सजण्याचा सोहळा

निर्मिलेस तू जग सुंदर प्रभु,
त्याहुन सुंदर मोह
बाग फुलांची डोळ्यापुढती
आणि वासनाडोह

सभोवताली लाख गिधाडे
मोर नाचतो उरी
तूच जडविले तुझ्या जगाशी
दृढ नाते श्रीहरी...

## सुकलेली

तू अशी सुकलेल्या शपथा घेऊन
फुलवायला अधेमधे येतेस तेव्हा
माझ्या फुललेल्या बागेतली
सुवासाची फुले कोमेजून जातात
हे तुला खूपदा सांगावेसे वाटते
पण
तुझी सुकलेली फुले खरी असतात
सुकलेली तूही खरी असतेस
डोळ्यापलीकडचे लपलेले पाणी खरे असते
आणि त्याहीपेक्षा
तुझे माझे सुखदु:ख खरे असते.
सुख माझ्या वाट्याला आलेले
दुःख तुझ्या ओंजळीत भरलेले.....

## विपंख

अवघा जन्मच जळत राहिलो
दुःख न उरलें बाकी
दे मरणाचा प्याला भरुनी
आज सुखाने साकी

बाग फुलविली मात्र निखारे
सगळे फुलुनि आले
आणि माझिया ओंजळीतुनी
रक्तच रक्त जहाले

मी दुसऱ्यांचे पुशिले अश्रू
भार वाहिला त्यांचा
त्यांच्या ओठी गीत फुलविले
सुवास प्राजक्ताचा

कळले हे जग..कळली नीती
व्यर्थचि शिणणे झाले
विपंख मी झालोय...आज जग
बेहोषीत बुडाले

अता पराभव असह्य झाला
ये ओठाशी साकी
दारापुढती आली आहे
देवाची पालखी !

## असे जगता येते

डोळे बंद करता येतात, तडफड पहायला नको म्हणून
कान झाकून घेता येतात, आक्रोश पोचायला नको म्हणून
जळत्या चितेकडे पाठ केल्यावर जीवन फार सुंदर आहे
आपल्याच पायतळीच्या आपल्या सावलीत सुख उदंड उदंड आहे

असे जगता येते.... आपल्या दारापुढे बाग फुलविता येते
खिडक्यादारे बंद करून आपले गाणे ऐकता येते
चामड्याचे डोळे बंद करता येतात चिरंजीव स्वार्थाची पट्टी बांधून
दुर्दैव एवढेच की
जागरुक आत्म्याच्या पापण्या बंदच करता येत नाहीत...

## शपथ

माझी तुला एक शपथ आहे
तू हा जाईफुलांचा सुवासिक गजरा
माळूं नकोस

हें असें पहाटस्वप्नासारखे
अंजिरी पातळ नेसू नकोस

आषाढघनासारखे हे सावळे काजळ
लाजभरल्या डोळ्यांत घालू नकोस

आणि सूर लागलेल्या सतारीसारखी
माझ्यासमोर बसूं नकोस

कारण हे सगळे सगळे
हरवलेल्या कवितेसारख्या
माझ्या प्रियेचे रूप होते

तुला माझी शपथ आहे
तू तुझ्याच सगुणरूपाने माझ्या मनात ये.....

## तटस्थ !

थोडासा तटस्थ होऊन पाहू लागलो
तर ओल्या पापण्यांनी बायको म्हणाली
: तुम्ही आज अगदीच निराळे दिसता
अनोळखी माणसाच्या सावलीप्रमाणें
कुठे तरी कधी तरी पाहून न पाहिल्यासारखे
चांदण्यांत भीती वाटल्यासारखे ...

: तू सुध्दां आज अशीच दिसतेस
प्रवासात भेटलेल्या मुलीसारखी
खूप खूप दूर उभी राहून हसल्यासारखी
पुनर्जन्म झालेल्या कवितेसारखी.....

: असे माझ्या आरपार डोळे लावून काय पाहता ?
तुमच्या श्वासाएवढ्या अंतरावर तर मी आहे
पाण्यातून बाहेर येऊन असे पाणी काय निरखून पाहता ?

जन्मभर पाण्यात होता
पाणी कधी आयुष्याला जाणवलेच नाही काय ?
अजून देखील पाण्यातच भिजत आहेत तुमचे पाय !'

: पाण्यात राहून डोळे आंधळे झाले होते
एक ममत्व पारंपारिक वासनेमधून फुलत होते
संप्रदाय म्हणूनच केवळ दिशाहीन देवाण घेवाण
एरव्ही मी म्हणजे मी– तू म्हणजे तू

एवढेच सत्य नाही का ?
कलम जुळले तर
रसरूपरंगगंधित फुलबाग
नाही तर
अनारंभ.....अनंत आणि अज्ञात प्रवास.
कुणाची तरी सोबत
झाडाखाली दशम्या खाण्यापुरती.
तिथून पुढे चार मैल
कुणाची तरी सोबत
डोळ्यातले पाणी वाहण्यासाठी.
तिथून पुढे....तिथून पुढे ???
म्हणजे शेवटी एकटेच की
सोबत तशी अधूनमधूनची
जशी तुझी.

: डोळे भरण्याचे काही कारण नाही
हा एक आपला तुझ्यामाझ्यामधला विचार
दूर काठावर उभे राहून अभ्यासलेले पाणी
आपणच पाहिलेले आपले नाटक
आपणच केलेला आपला गुणाकार भागाकार
आपण खरे तर शून्य
गणितापूर्वीचे....करतानाचे....संपल्यानंतरचेही !

# चांदण्या रात्री

चांदण्या रात्री प्राजक्तगात्री नको ग डोळिया पाणी
अशा भाग्यवेळी राजसबाळी गावीत अमृतगाणी

सुखार्त होऊन चांदणे पिऊन धुंदीत पापणीकांठ
सुगंधी फुलात मदिराजळांत झेलू या सुखाची लाट

तुझिया केसाला गजरा वासाचा जशी ग नक्षत्रमाला
लपविता मुख श्वास हुंगे सुख भोगिल्या कस्तूरीकळा

नको बोलू आज..माझ्यासाठी लाज..हवी ग डोळ्यात नशा
एकदाच हास....विसर स्वतःस...बुडू दे खळीत दिशा

खूप बुडालो मी घनदाट तमी सोशिली अपार व्यथा
तेव्हा कुठे सुखी प्रिये चंद्रमुखी वाचली चांदणी कथा

चांदण्या रात्री भावनागात्री, नको ग डोळीया पाणी
अशा भाग्यवेळी यमुनेच्या जळी रंगली राधिकाराणी

## फुलवंती

फुलवेडे मन माझे
तू साक्षात् फुलवंती
दरवळून हसणाऱ्या
चाफ्यापरी तव प्रीती

शिरिषापरि तू कोमल
तू मुग्धा लाजवेल
स्पर्शाच्या भासाने
गंधकळी थरथरेल

तू पहाटवेळेला
मम हृदयी पारिजात
गंधधुंद रातराणी
तू रात्री मम करात

माझ्या अनुरागफुला
तू फुलता मी फुलतो
म्लान तुला पाहुन मी
पाकळयांत व्याकुळतो...

## आक्रांत

एक मागीतले होते
आणि दिलेस दुसरे
अशा देण्याने ईश्वरा
काय साधलेस बरे ?

मला नको ते देऊन
उगा टाकले दुःखात
तू दातारा ठरलास
माझ्या उरात आक्रांत

माझे इच्छित जर
तुझ्याजवळ नव्हते
काही बाही देण्यापेक्षा
गप्प बसायचे होते.....

...ठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
दि:
नोंद दि.

## मेंढराचा जन्म

मेंढराच्या जन्माला घालायचे तर
कशाला सिंहाचे दिलेस काळीज ?
इथें तिथे नजर झुकवायची तर
कशाला नक्षत्रे डोळ्यात दिलीस ?

पोटासाठीच इथे धाडलेस तर
नुसते पोटच द्यायचे होतेस !
एवढ्याशा उन्हाने पेटून उठणारे
कशाला कापराचे मन दिलेस ?

मुकेपणाने जगलो असतो ना मी
कशाला शब्दांना दिलीस धग ?
आयुष्याचे खरेच थुंकीपात्र केलेस
भोवताली तुझे हसणारे जग

बंड करून उठली वादळे तेव्हा
विझवली खोटा शहाणपणा शिकवून
प्रहार करायला शिवशिवताहेत हात
पोटात की रे तरवार दिलीस ठेवून !

## आपण दोघे

काही तुझ्यासाठी
काही माझ्यासाठी
काही दोघाविना राखू जगासाठी !

तुझे एक गाणे
माझे एक गाणे
आणि एक गाणे उध्वस्तांच्यासाठी !

एक घास माझा
एक घास तुझा
एक घास मात्र भुकेल्यांच्या ओठी !

तू जशी माझी
आणि मीही तुझा
आपण दोघे मात्र दिशाहीनांसाठी !!

# दारे

सगळी दारे उघडी ठेवली म्हणून बरे झाले
नाहीतर सडून गेलो असतो आजवर हवाबंद पोकळीत
दारे उघडी ठेवल्याने थोडीशी धूळही आली हे मान्य
पण सुगंधाच्या लाटाही आल्या वाऱ्यासवे नियमित

तसे चटके बसले वैशाख उन्हाचे...खूपसा भाजला गेलो
पण चंद्रकिरणाच्या चंदनीलेपाचे सुख आगळे आहे
काहीसा लुबाडलो गेलो कळत नकळत देखील
खेद नाही...त्यानी सुद्धा काही शिकविले आहे

दारे उघडी ठेवली म्हणून मी खूप झालो
रक्तालाही काही सुवास असतो हे कळून आले
डोळ्यातल्या खाऱ्या पाण्याचे तीर्थ जिभेने चाखले
तेव्हा कितीतरी वेदनांचे अर्थ कळून आले

उघड्या दाराने येणाऱ्या ऊनपाऊसवादळांनो
झरोक्यातून दिसणाऱ्या माझ्या चंद्रतारकांनो
तुम्ही होता सगेसोयरे म्हणूनच अस्तित्व माझे
मातीच्या पणतीत दिवा शांत तेवतो आहे.

# त्यांच्यासाठी

त्यांच्यासाठी या डोळयात आसू आहेत
ज्यानी आपला जन्म कापरासारखा जाळला.

त्यांच्यासाठी कंठात हुंदका आहे
ज्यानी आपल्या घराला उजाड करून
दुसऱ्यांचे माळरान फुलवले.

त्यांच्यासाठी ओठात गाणे आहे
ज्यांनी ओंजळीतल्या निखाऱ्यांना नक्षत्रे मानली.

त्यांच्यासाठी रक्तात वीज आहे
ज्यांनी नियतीचे प्रहार झेलले.....पेलले.

पंचमहाभूतांचे स्वभावधर्म
ज्यांच्या देहमनात सामावलेले
त्यांच्यासाठी आमचे मस्तक नम्र आहे !

## व्रत

या जन्माचे व्रत ऐसे की
दीप उजळता मनी रहावा
चौबाजूच्या अंधारातुन
आपण अपुला मार्ग पहावा

दुर्दैवाच्या जखमा मिरवित
पुन्हा रणावर सिध्द असावे
पायतळाशी आगनिखारे
तरी मुखावर हास्य फुलावे

दीनपोरके घालुन पोटी
सत्तांधाशी झुंज करावी
उदासलेल्या घरामनातुन
फुले सुखाची सदा हसावी

ज्या मातीतून अम्ही जन्मलो
त्या मातीचा टिळा असावा
शब्दांना पावित्र्य असावे
भाग्यचंद्र डोळयांत दिसावा

या जन्माचे व्रत ऐसे की
आत्मसुखाचा लळा नसावा
कार्यमग्नता हे प्रभुपूजन
जन्मसमाप्ति हाच विसावा !

## जन्मकरंटे

इथे उशाला सगळी दौलत
पाय भिकारी वणवण फिरती
नक्षत्रे डोळयांत तरीही
शोधित फिरतो खापरपणती

दिलेस तू आभाळ झुकवुनी
तरि झोळीचा मोह सुटेना
तुझी उमटली शुभपदचिन्हे
आंधळयास पण काहि दिसेना

असेच आम्ही जन्मकरंटे
तुला टाळुनी तुला शोधितो
आणि नदीच्या काठावरती
पाणी पाणी म्हणून मरतो......

## रात्र

ही पहिली रात्र प्रिये
ओढीची....भरतीची
स्पर्शातुर झालेल्या शरीराच्या प्रीतीची

दूरचेहि जवळ आज
तू सुंदर....मी सुंदर
आज दिवा मिणमिणता चंद्राहुन बघ सुंदर

हा गजरा....ह्या नजरा
मौन किती हे सुंदर
तू-मी पण सरणारा निकटपणा किति सुंदर !

हे सुंदरपण घेऊन
रात्रफूल आज फुले
तव प्रसन्न मुद्रेला रंभेचे रूप मिळे.

ही पहिली रात्र प्रिये
सुखभरल्या प्रीतीची
आज सखी दीपावली गात्रातिल ज्योतीची !

# दिवा

कोटयावधि रक्ताचे एक विसरलेले नाते
पुन्हा इथे जोडलेले दिसावे...हसावे....विकसावे
एवढयाचसाठी
हा रक्ताचा दिवा घेऊन मी निघालो आहे
सारीकडे सावल्यांचीच भुतावळ रे
चामडीच्या रंगाची नुसती आरास रे
बांध कुणी घातले इथे प्राणाप्राणामधून
विष कुणी कालविले रे पाण्यापाण्यामधून
कापायाच्या आधी तुमची नाळ एक होती
एकाच आईने दूध दिले तुमच्या कोवळया ओठी
अरे एकच होता सूर तुमच्या श्वासामधला
जन्म मरणाचा आकार तसा आयुष्याला
स्वतःचीच ओळख विसरून कसे झाला क्रूर ?
स्वच्छ चांदण्यामधून कुणी पसरला धूर ?
अंधार होऊन काळजाचा सूर्य झाकू नका
कमळावरती तरवारीचे पाते टाकू नका .........

तुम्ही मारलेत तरी पुन्हा जन्मून आलो आहे
हा रक्ताचा दिवा घेऊन मी निघालो आहे.....

## पहाट

सखि, तुझिया रूपापरि
सुंदरशी ही पहाट
आणि तुझ्या प्रीतीपरि
फुलणारा पारिजात

आज कशी तू दिसशी
दंवभिजल्या कुसुमापरि !
तू प्रसन्न आज कशी
सत्कविच्या स्वप्नापरि !!

हे इतके सुंदरपण
ही इतकी सोज्वलता
जीवनात तू माझ्या
तुलसीची मंगलता

या पहाट वेळेला
तृप्तीने भरते मन
पुण्यमयी सरितेचे
शुभवेळी हे दर्शन !

# अश्रु

अश्रु आहेत म्हणून
रडता तरी येते
भरून आलेले आभाळ
रिते करता येते

शब्द दुबळे होतात
तेव्हाची ही भाषा
दुखऱ्या जीवाने व्यथा
सांगायाच्या कशा ?

अंधारातले अश्रू
आपले जिवलग सोबती
आपले सांत्वन करून
दुःखे वाहून नेती

अश्रू झिरपतात म्हणून
जगता तरी येते
नाही तर हे मडके
कधीच फुटले असते.....

## भेटायलाच नको होते

खरे बोलायचे तर भेटायला नको होते
आत्ता नव्हे....तेव्हाच पहिल्यांदाच नको होते.
भेटायचेच होतें तर नुसतेच भेटायाचे होते
हजारोंना भेटतो ना....तसेच भेटायाचे होते.

हे आपले भेटणे परस्पराला भेटले
इतके भेटले....इतके भेटले कीं वेगळेपण सरले
आणि मग सुख दुःख व कळाही दुणावल्या
उजेडात उजेडाच्या मिसळून गेल्या सावल्या.........

मला थोडे रडू वाटते पण तुझे डोळे भिजतील
मला थोडे मरू वाटते पण तुझे प्राण थिजतील
मला माझे म्हणून थोडे एकटे जगू वाटते
पाणी मिसळून गेलेय पाण्यात, भेटायलाच नको होते.

# भावजीवनाचे देवी

स्वप्ने डोळ्यात ठेवून
माझ्यासवे बोलतेस
मी चल म्हणतो
त्या वाटेने चालतेस

अशा कुठल्या तेजाने
सांग दिपून गेलीस ?
आणि मंतरल्यासारखी
माझी सावली झालीस !

तुझी चंदनाची प्रीती
तुझे आभाळाचे मन
चांदणे प्यालेले तुझे
आगळे निराळेपण ........

माझ्यासाठी फुलणाऱ्या
भावजीवनाचे देवी,
माझे आयुष्य उन्हांत
याची जाण असो द्यावी !

## सीमा

हवे नकोच्या सीमेवरती
डोळ्यांची भाषा
एक पापणी फार संयमी, एकीला आशा

एक ओठ लाजून हुळहुळे
एक शांत कोरडा
एक पाळतो मौन, दुज्याच्या स्मितात रंगे विडा.

एक गाल सात्विक समंजस
एक गुलाबी फूल
भांग सरळ निष्पाप परंतु बटा घालती भूल

एक चेहरा फार भावडा
एक बोलका खुळा
एक लपवितो मनिचा चाफा, एक गंधमोकळा.

हवे नकोच्या सीमेवरती
गोंधळते प्रीती
पुढे गुलाबी वसंतवैभव, मागे जननीती....

## न्यायाधीश

कुणी न सोसेल
एवढे सोसले
निखारे झेलले तळहाती.

आत्मा मारूनिया
देह जगविला
विटाळ जाहला आयुष्यासी.

शब्दांच्या आगीत
जळोनिया गेलो
तरीही उरलो निर्लज्जसा.

अगा, न्यायाधीशा !
विठ्ठला पाषाणा
असा काय गुन्हा सांग तरी !

## नव वर्षा, ये

येताना पाहिली असशील उजाड माळरानासारखी शेते
चारापाण्याविना मेलेल्या जनावरांची विखुरलेली प्रेते
पाहिले असतील बायाबापडे गांव सोडून जाताना दूर
पाहिले असशील गोठून गेलेल्या पापण्यामधले कढत पूर

पोर झाडाला टांगून दगड फोडतेय बाळंत बाई
भाकर खाल्ल्यावरती तिथे प्यायलादेखील पाणी नाही
पाहिली असशील गरीब गुरे खाटीकखान्यात शिरताना
जिवंतपणी मरणाच्या साऱ्या यातना भोगताना ?

पाहिलास ना सारा आकांत तुझ्या वाटेवर पसरलेला
या वर्षीचा जोंधळा तर जन्माआधीच मातीत गेला
कुणास ठाऊक पुढे आणखीन काय वाढून ठेवले आहे ?
कुणास ठाऊक भविष्याच्या टाचेत काय काय चिरडणार आहे ?

विठ्ठलाचे रूप घेऊन नव्या वर्षा, धावत ये
आभाळाची झारी करून भूमीवरती शिंपत ये
मातीमधल्या कुशींमधून शेतावरती डोलत ये
या जगाचे जीवन होऊन नद्यांमधून वाहात ये

जिथले ओठ सुकून गेले तिथले पोट शांत कर
जिथले बळ मरून गेले त्या शेतात नांगर धर
नव्या वर्षा, तुझे राज्य आईच्या पदराचे असू दे
झाले गेले विसरून जाऊ, असे दान पडू दे ! !

## ऊन्ह-पावसाळे

तुवां दिलेल्याचा
केला मी सन्मान
सोसायाचे वाण घेतले मी.

फुले आणि अग्नि
नाही स्पर्शभेद
हर्ष आणि खेद एकरूप.

तूच देशी शाप
उःशापहि तूच
देता घेता तूच सर्वदर्शी

कशाला मी उगा
भरावेत डोळे
ऊन्ह पावसाळे तुझे,...तुझे !

# तू

तू नच केवळ मोहसुंदरी
तू न वासनारती
तू नच केवळ यौवनगंधा
तू न शेजसोबती

तू मदिरेचा प्याला असुनही
तू अमृतवाहिनी
तू देहाचे कांचनमृग तरि
हृदयाची स्वामिनी

तहान तू ...तृप्तीही तू सखि
रात्रहि तू....तू पहाट
तू जळणारी अत्तरज्योती
निरांजनी तू वात

रातराणी तू दरवळणारी
तू देवाचे फूल
रूप रतीचे मोहक तरिही
तुझे सतीचे कुल....

# शाप

तहान होती या ओठांना
तेव्हा नव्हते पाणी
ओठातच तळमळून सुकली
सूरपोरकी गाणी

आज चहुकडे पाणी पाणी
तहान कोठे गेली
सूरमोहिनी आली लाजत
गाणी पण सरलेली

शाप असा कां मला कळेना
की हे मृगजळ सारे
एका हाती फुले सुवासिक
एका हाती निखारे !

# आई

बापावेगळी आम्ही पोरे, उजाड उजाड होते सारे
सारी नाती दूर दूर, फक्त काळोखाला पूर
असे वादळ आले होते, घर मोडून गेले होते
रडायाचे तरी किती डोळे विझू आले होते.

आम्ही पिले खूप भ्यालो, कारण उघड्यावरती पडलो
कोरड्या उपदेशांचे घोट पोट भरलेल्यांचे प्यालो
कुणी म्हणे वार लावा, कुणी सांगे माधुकरी
कुणी अनाथालयासाठी आम्हापुढे भाषण करी.

असे अकल्पित ऐकूनिया आम्हीं खूप रडायचो
एका ऊबदार पदराखाली रडवे डोळे मिटायचो
परी पदराचिये आड एक आगळी जिद्द होती
त्या सूर्यप्रकाशात आम्हा कधी कळली नव्हती

दळणी कांडणी करून आम्हा भरविले घास
स्वतः अंधार पिऊन रात्री दाविला प्रकाश
सदा जुनेर नेसली परी आम्हा टापटीप
उणे भासू दिले नाही, तीच आई आणि बाप

देहमनाने थकली...कुणापुढे ना वाकली
वादळात थरारली ज्योत कधी ना विझली
तिने खर्चुनिया जिणे, पुन्हा उभारले घर
आता लतांचिया माळा उंच कौलारांच्या वर

## प्रकाशयात्रा

अंधारातून प्रकाशाकडे जाणाराला सूर्यनारायण सामोरा जातो
त्याच्या प्रत्येक पावलाखाली तो उगवती पहाट देतो
त्याच्या बाहूत बळ देतो....त्याच्या देहात वीज देतो
क्षितिजपल्याडच्या त्याच्या डोळ्यात तो तेजस्वी जग देतो.

किर्रर रात्रीचे...खाचखळग्याचे...हरवून जाण्याचे भयच नसते
चालणाऱ्याच्या हृदयामधून एक जागता दिवा असतो
तमसो मा ज्योतिर्गमय...तो दीपाचे स्तोत्र म्हणतो
तेव्हा कोणी त्या स्तोत्राला आपले समर्थ सूर देतो.

चालणाराचे पाऊल कधी रुतत नाही चिखलामधून
चालणाराचे पाऊल कधी गुंतत नाही कमळामधून
चालणाराची तपश्चर्या एखादे दिवशी सफल होते
लख्ख चांदण्याचे आभाळ त्याच्या पावलांपाशी येते !

## दरी

न बोलताच सर्व मावळल्या राती
न तेवताच सर्व मालवल्या ज्योती
न उमलताच फूल कोमेजून गेले
गीताआधीच सूर कंठदूर झाले

तू मनात येऊनही नाही आलीस घरीं
एका जन्माइतकी आता वाटेत दरी !

# अशीच हवी होतीस

अशीच हवी होतीस
साधी बाळबोध वळणाची
निरांजनातील ज्योत तेवते तशी.

अशीच हवीं होतीस
अभंग ओवीसारखी
पहाटवेळेला भूपाळी ऐकतो तशी.

अशीच हवी होतीस
पारिजात फुलासारखी
नाजुक सुवासिक ओंजळभर.

आणि अशीच हवी होतीस
उन्हात फुलणारी
सावलीत दरवळणारी जन्मभर!

# मी माझ्या कवितेसह

गेल्या ७।८ वर्षातल्या या कविता. विविध अनुभवातून जन्मलेल्या.

जीवनातील कडू गोड, सगळेच मी स्वीकारले आहे. फारशी तक्रार न करता. जगातल्या चांगुलपणावर माझा विश्वास आहे. कुणाला फुलवताना कोणीतरी सुकत असतो, कुणाला घडवताना कुणीतरी मोडत असतो, याची मला नम्र जाणीव आहे. जगावर रागावून उगाच आकांडतांडव करणे आणि उध्वस्त भाषा करणे मला मंजूर नाही. चांगली मने आहेत म्हणूनच हा सृष्टीचा व्यवहार चालू आहे. जीवनातील आनंद आणि सौंदर्य सोडून त्याचे ओंगळ आणि किळसवाणे प्रदर्शन करणे मला आवडत नाही. डोळ्यात स्वप्ने ठेवून जिद्दीने वाटचाल करणे याला मी पुरुषार्थ मानतो. आपल्या योग्य तक्रारी जरूर नोंदवाव्यात पण उगाच आग लागल्यासारखी आक्रस्ताळी ओरड करणे हे निकोप मनाचे लक्षण नव्हे.

विविध रसांचे अनुभव घेत माझी कविता अवतरली आहे. प्रेमाला जीवनात विशेष स्थान आहे. प्रेम ही अशी संजीवनी आहे की तिच्या सिंचनाने करपलेल्या वेलीवर सुवासिक फुले फळे यावीत. झाडांच्या मुळ्या पाण्यासाठी जमिनीत दाही बाजूस पसरतात तसा मी प्रेमासाठी तहानेला असतो. हे प्रेम मला ठायी ठायी मिळते, ही माझी पुण्याई. व्यक्तीचे कर्तृत्व एकट्याने उभे होत नाही तर त्याला इतरही आधार हवे असतात. असे आधार माझ्यातल्या गुणांना मिळाले आहेत. जीवनाच्या वाटेवर ठिकठिकाणी असणारे दिवे नाकारता येणार नाहीत.

बऱ्याच ठिकाणी माझी कविता परमेश्वरस्वरूप झाली आहे. तो माझा व्यक्तिगत अनुभव आहे. त्याने मला त्याचे अस्तित्व अनेकदा जाणवून दिले आहे. ज्या विश्वसौंदर्याने मीं मोहित झालो त्याच्या रचनाकाराविषयी मला लहानपणापासूनच कुतुहल आणि आदर आहे. ज्या जगाविषयी माझ्या मनात कायमची ओढ आहे त्या जगातील चांगल्याबरोबर वाईटही मी ओंजळीत घेत आलो आहे.

असा मी माझ्या कवितांमधला अनवाणी चालताना सूर्यचंद्र माथ्यावर घेऊन चालणारा यात्रिक.

माझ्या या कविता संग्रहरूपाने प्रसिद्ध करतांना मला अनेकांचे सहकार्य लाभले. त्यांचा इथे नामनिर्देश करणे त्यांना रुचणार नाही. पण माझ्या मनात त्यांची स्वच्छ नोंद आहे. त्या सर्व प्रियजनांचा मी ऋणी आहे. मित्रवर्य श्री. नारायण सुर्वे, आणि अभिनव प्रकाशनाचे श्री. वामनराव भट यांनी प्रकाशनाचे काम हाती घेतले म्हणून तर माझी कविता रसिकांसमोर येत आहे. या दोघांचे आभार किती मानावेत ?

— दत्ता हलसगीकर.

REFBK-0020489
REFBK-0020489

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
2048 30/3/

# : अनुक्रम :


| | | |
|---|---|---|
| १ | ते म्हणालेत | ९ |
| २ | स्वागत | ११ |
| ३ | सुंदर! | १२ |
| ४ | दुसऱ्याशी तुलना केली असती | १३ |
| ५ | अंधारयात्रा | १४ |
| ६ | उणे दुणे | १५ |
| ७ | रात्र अशी अंधारी | १६ |
| ८ | त्याला इलाज नाही | १७ |
| ९ | बाकी | १८ |
| १० | मित्र | १९ |
| ११ | पदर | २० |
| १२ | गाणे | २१ |
| १३ | अशिवाची छाया | २२ |
| १४ | वादळभाषा | २३ |
| १५ | मेघदूत | २४ |
| १६ | एक दिवस | २५ |
| १७ | फार दिवसांनी | २६ |
| १८ | कळा | २७ |
| १९ | छळ | २८ |
| २० | पाठीवरच्या गोणी | २९ |
| २१ | शब्द | ३० |
| २२ | रोप | ३१ |
| २३ | म्हणून म्हणतो | ३२ |
| २४ | शाप | ३३ |
| २५ | जखमा | ३४ |
| २६ | ओलीस | ३५ |
| २७ | लाव गे तू दीप | ३६ |
| २८ | काळोख | ३७ |
| २९ | झपझप चाललेत पाय | ३८ |
| ३० | उशीर | ४० |
| ३१ | शब्द | ४१ |
| ३२ | नाते | ४२ |
| ३३ | सुकलेली | ४३ |
| ३४ | विपंख | ४४ |
| ३५ | असे जगता येते | ४५ |
| ३६ | शपथ | ४६ |
| ३७ | तटस्थ! | ४७ |
| ३८ | चांदण्या रात्री | ४९ |
| ३९ | फुलवंती | ५० |
| ४० | आकांत | ५१ |
| ४१ | मेंढराचा जन्म | ५२ |
| २ | आपण दोघे | ५३ |
| ४३ | दारे | ५४ |
| ४४ | त्यांच्यासाठी | ५५ |
| ४५ | व्रत | ५६ |
| ४६ | जन्मकरंटे | ५७ |
| ४७ | रात्र | ५८ |
| ४८ | दिवा | ५९ |
| ४९ | पहाट | ६० |
| ५० | अश्रू | ६१ |
| ५१ | भेटायलाच नको होते | ६२ |
| ५२ | भावजीवनाचे देवी | ६३ |
| ५३ | सीमा | ६४ |
| ५४ | न्यायाधीश | ६५ |
| ५५ | नव वर्षा ये | ६६ |
| ५६ | ऊन्ह-पावसाळे | ६७ |
| ५७ | तू | ६८ |
| ५८ | शाप | ६९ |
| ५९ | आई | ७० |
| ६० | प्रकाशयात्रा | ७१ |
| ६१ | दरी | ७२ |
| ६२ | अशीच हवी होतीस | ७३ |